नि.दि. दावा क्र. ८२/२०१७
छत्रपती काथोड पाटील
वि. पार्वतीबाई शंकर जोशी व इतर

## नि. ७४ वरील आदेश

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून त्यांच्या विरूध्द दि. ३०/०९/२०१९ रोजी पारित झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द करून मागण्यास झालेला १३३२ दिवसांचा विलंब माफ करून मागितलेला आहे. त्यांच्या कथनानुसार दि. २३/१०/२०१८ रोजी त्यांचा यापुर्वीचा नि.१७ चा अर्ज रक्कम रू. ६००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात आला होता परंतु, त्या संदर्भात प्रतिवादी यांना त्यांच्या नेमले वकिलांकडून कोणतीही माहिती मिळाली नाही व त्यामुळे खर्चाची रक्कम वेळेत भरली गेली नाही. याकारणास्तव प्रतिवादी क्र. ३ यांचे विरूध्द पुन्हा एकदा *"विनाकैफियतचा"* आदेश पारित झाला. सदर आदेशाची माहिती त्यांना दि. ०२/०९/२०२३ रोजी त्यांचे नेमले वकिल ॲड. श्री. पितळे यांच्याकडून समजल्यानंतर त्यांनी पुन्हा प्रस्तुतचा अर्ज दाखल करून १३३२ दिवसांचा विलंबा माफ करून मागितलेला आहे.

२. वादी यांनी नि. ७८ कडे पुरसिस दाखल करून त्यांनी यापुर्वी नि. ६४ कडे जे म्हणणे सादर केले आहे तेच म्हणणे सदर अर्जाकरीता वाचण्याची विनंती केली आहे. नि. ६४ मधील कथनानुसार प्रतिवादीला पुरेशी संधी मिळूनही नि.१७ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम भरील नाही. जवळपास १ वर्षाहुन अधिक काळ प्रतिवादीने न्यायालयीन आदेशाच पालन केले नाही व पुन्हा ४ ते ५ वर्षांनी कल्याण येथील स्पे. मु. नं. ३६६/२०१९ चे कामी बाधा निर्माण होईल या भितीने प्रतिवादीने पुन्हा प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमुद केलेले कारण खोटे असून प्रतिवादीने स्वत: हुन अर्ज दाखल करण्यास दिरंगाई केलेली आहे. विलंब माफ करण्याचे कोणतेही ठोस कारण अर्जात नमुद केलेले नाही. जाणून बुजून केलेल्या विलंबाकरीता अर्ज नामंजुर करणेच योग्य होईल असे वादीने कथन केले आहे.

३. अर्ज वाचला. म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांना ऐकले. नि. १७ वरील आदेश पाहिला.

४. दावा हक्कज्ञापन व मनाईकरिता दाखल आहे. प्रकरणाचा निकाल गुणवत्तेवर लागणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. जर प्रतिवादीला त्याची बाजू मांडू दिली नाही, तर तो त्याच्यावर अन्याय होऊ शकतो. त्यामुळे प्रकरणाच्या व्यापक हितासाठी हा विलंब माफ करणे योग्य आहे. प्रतिवादीच्या या दिरंगाईमुळे वादीला जो नाहक त्रास झाला आणि वेळेचा अपव्यय झाला, त्याची भरपाई भारी दंड लावून केली जाऊ शकते. प्रतिवादीने यापूर्वीच्या नि. १७ वरील आदेशाचे पालन केले नाही, ही बाब गंभीर आहे. न्यायालयीन प्रक्रियेत होणारा विलंब टाळणे आवश्यक असले तरी, प्रतिवादीला आपली बाजू मांडण्याची संधी न दिल्यास त्याला मिळणारा न्याय अपूर्ण राहील. वादीला होणारा त्रास दंडाच्या स्वरूपात भरून काढता येईल. ***कैलाश विरुद्ध नानखू (२००५) ४ एस.एस.सी. ४८०*** या प्रकरणात स्पष्ट केले आहे की, ऑर्डर ८ रूल १ प्रमाणे कैफियत दाखल करण्याची मुदत ही मार्गदर्शक (Directory) आहे, बंधनकारक (Mandatory) नाही. त्यामुळे न्यायदानाच्या अंतिम संधीपोटी, अत्यंत कडक अटींखाली आणि जुना दंड भरण्याच्या अटीवर प्रतिवादीस शेवटची संधी देणे योग्य होईल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**:- आदेश -:**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादीचा अर्ज खालील अटींवर मंजूर करण्यात येत आहे. |
| अ. | प्रतिवादीने १३३२ दिवसांचा झालेला विलंब माफ करण्यासाठी वादीला रु. ५०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) खर्चापोटी द्यावेत. |
| ब. | प्रतिवादीने यापूर्वीच्या नि.१७ वरील आदेशानुसार थकीत असलेला रु. ६००/- हा दंड देखील या खर्चासोबतच जमा करावा. |
| क. | वरील सर्व खर्चाची रक्कम ही आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत वादीला द्यावी किंवा न्यायालयात जमा करावी. |

नि.दि. दावा क्र. ८२/२०१७
छत्रपती काथोड पाटील
वि. पार्वतीबाई शंकर जोशी व इतर

| | |
|---|---|
| ड. | खर्चाची संपूर्ण रक्कम जमा केल्यानंतरच प्रतिवादीची कैफियत (Written Statement) रेकॉर्डवर घेतली जाईल. जर प्रतिवादी दिलेल्या मुदतीत खर्च भरण्यास अपयशी ठरला, तर हा अर्ज आपोआप (Automatically) नामंजूर समजला जाईल आणि प्रतिवादीचा कैफियत दाखल करण्याचा हक्क कायमचा बंद होईल. |
| २. | ही प्रतिवादीला दिलेली अंतिम संधी (Last & Final Opportunity) आहे. |

URMILA PARASHRAM KOLI
Digitally signed by URMILA PARASHRAM KOLI
Date: 2026.04.27 17:21:54 +0530

दि. २७.०४.२०२६

**श्रीमती यु.पी.कोळी**
सह दि. न्या.क.स्तर. शहापूर

**प्रमाणपत्र**

आदेशाची तारीख :- २७/०४/२०२६
तपासण्याची तारीख :- २७/०४/२०२६
सही केलेली तारीख :- २७/०४/२०२६
अपलोड केल्याची तारीख :- २७/०४/२०२६

प्रमाणित करण्यात येते की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मुळ शब्द न शब्द न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे जशास तसा खरा व बरोबर आहे.

न्यायालयाचे नावः- सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शहापूर

दिनांक-२७/०४/२०२६
स्थळ - शहापूर

एस.एस. काकडे
(लघुलेखिका नि.श्रे.)